| Sr. No. | Name of CBO | Internal Audit Para | Compliance |
|---|---|---|---|
| 1. | NB FPC | We observed that 1st tranche has been released to NB FPC CBO but before disbursement of tranche CBO own contribution was not injected in the Smart account (Para No.1) | Before disbursing the first instalment, CBO had deposited the self-contribution amount in SMART Dedicated Account. Accordingly, the grant was disbursed, but it was observed that CBO had withdrawn the self-contribution amount before the grant was actually credited to SMART Dedicated Account. After this matter was noticed, a show cause notice was issued to CBO and Nodal Officers RIU and DIU on Date-06.11.2024 and the entire self-contribution amount has been paid by CBO and only after that the 2nd Tranche has been disbursed to CBO - Bank Statement, Show Cause Notice is attached along with it. For your reference |

Technical Officer
Project Implementation Unit-Agri
Commissionerate of Agriculture, M.S. Pune

# मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प
## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-कृषि, पुणे

शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, गोखले नगर, पुणे

दूरध्वनी - ०२०-२५६५६५७७, ई मेल - smart.piuagri@gmail.com


जा.क्र./पी.आ.यु/स्मार्ट/१७३० /२०२४ दि.०६ / ११ /२०२४

कारणे दाखवा नोटीस

विषय- एन.बी. शेतकरी उत्पादक कं.लि. रामटेक, जि. नागपूर या सिबिओने स्वहिस्सा काढले बाबत....

संदर्भ :-१. या कार्यालयाचा अनुदान वितरण आदेश जा. क्र. १४०२/२०२४, दि.११.०९.२०२४
२. विभागीय अंमलबजावणी कक्ष, नागपूर यांचे पत्र जा. क्र. ३४३४/२०२४, दि.०१.१०.२०२४

उपरोक्त विषयान्वये मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत एन.बी. शेतकरी उत्पादक कं.लि. रामटेक, जि. नागपूर या सिबिओच्या उपप्रकल्पास दि.०८.०३.२०२३ रोजी अंतिम मान्यता दिलेली असून सदर मान्यता देताना सिबिओ स्मार्ट प्रकल्पासाठी बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये स्वतंत्र चालू बँक खाते उघडून त्यामध्ये स्वहिस्सा जमा करेल व सदर खाते सिबिओचे दोन संचालक यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे असेल अशी अट नमूद करण्यात आली होती. तसेच जमा झालेला स्वहिस्सा व प्रकल्प अनुदान हे फक्त मंजूर उपप्रकल्पाच्या बाबींवरच स्मार्ट प्रकल्पाच्या संपादन मार्गदर्शक सूचना, प्रकल्पाची वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका व प्रकल्पामार्फत वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सूचनाचा अवलंब करून खर्च करणे बंधनकारक असल्याचे कळविण्यात आलेले आहे.

प्रथम हप्ता अनुदान मागणी सादर करतेवेळी सिबिओने त्रिपक्षीय अनुदान करारनामा सादर केलेला होता. तसेच प्रथम हप्ता अनुदान मागणीसाठी आवश्यक स्वहिस्सा रक्कम रु. १३.०६ लाख स्मार्ट प्रकल्पासाठी काढलेल्या स्वतंत्र चालू बँक खात्यात जमा करून दि.१५.०७.२०२४ रोजी बँक स्टेटमेंट सादर केले होते. त्याआधारे सिबिओस संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये प्रथम हप्ता अनुदान रक्कम रु. २५.०० लाख त्यांचे खात्यात जमा करण्यात आले होते.

जमा केलेल्या स्वहिस्स्यापैकी कंपनीने रक्कम रु. १०.०० लाख दि. २५.०७.२०२४ रोजी काढून घेतले. तद्नंतर कंपनीने दि.१२.०८.२०२४ रोजी रक्कम रु.२०.०० लाख जमा केले व दि.१३.०८.२०२४ रोजी पुनश्च सदर जमा केलेले रक्कम रु. २०.०० लाख परत काढून घेतले. त्यानंतर दि.१७.०८.२०२४ ते १२.०९.२०२४ पर्यंत सिबिओने या कालवधीत रक्कम रु. ३.०० लाख वेगवेगळ्या करणासाठी काढून घेतलेले दिसून येतात. म्हणजेच स्मार्ट प्रकल्पाचे अनुदान जमा झाले त्यादिवशी सिबिओच्या खात्यामध्ये फक्त रक्कम रु. ४६६१/- इतकीच रक्कम शिल्लक होती. अशा प्रकारे सिबिओने जमा केलेला सर्व स्वहिस्सा काढून प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनांचा व त्रिपक्षीय अनुदान करारनाम्यातील तरतुदींचा भंग करून वित्तीय अनियमिता केली आहे.

नोडल अधिकारी, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, या नात्याने आपण सिबिओला स्मार्ट प्रकल्पासाठी काढलेल्या चालू बँक खात्यामधून कोणत्याही प्रकल्प बाह्य कारणासाठी खर्च करता येणार नाही याची पूर्व कल्पना देणे आवश्यक होते. तसेच ई-पेमेंट स्लिप व्यतिरिक्त सिबिओच्या स्मार्ट प्रकल्पासाठी काढलेल्या

चालू बँक खात्यामधून कोणत्याही प्रकारे व्यवहार होणार नाही याबाबत आपण संबंधित बँक शाखेस कळविणे आवश्यक होते. याबाबतीत आपणाकडून दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. संदर्भ क्र. २ अन्वये आपण सिबिओला मिळालेल्या प्रथम हप्त्यातील भाग-अ चे संपूर्ण अनुदान खर्च झालेला असल्याने आपण उर्वरित अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्ताव सादर करताना आपण सिबिओचे बँक स्टेटमेंट तपासून स्वहिस्सा बाबत खात्री करणे आवश्यक होते. मात्र आपणाकडून कोणत्याही प्रकारे सिबिओच्या बँक स्टेटमेंटची तपासणी न करता अनुदान मागणी प्रस्ताव सादर केलेला आहे. ही अतिशय गंभीर स्वरुपाची बाब असून आपण केलेल्या शासकीय कामातील हलगर्जीपणा बद्दल आपले विरुद्ध प्रशासकीय कारवाई का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा सदर नोटीस मिळाले पासून ७ दिवसाच्या आत विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर यांच्या अभिप्रायासह सादर करावा. विहित समयमर्यादेत खुलासा प्राप्त न झाल्यास आपले काही म्हणने नाही, असे गृहीत धरून पुढील प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(अशोक किरनळ्ळी)
प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषि
स्मार्ट प्रकल्प तथा कृषि संचालक, आत्मा
कृषि आयुक्तालय, पुणे

प्रति,

नोडल अधिकारी,
जिल्हा अंमलबजावणी कक्ष, नागपूर

प्रत- १.मा. प्रकल्प संचालक, स्मार्ट यांना माहितीस्तव सविनय सादर
२.विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

# कृषी विभाग
## जिल्हा अंबलबजावणी कक्ष (स्मार्ट)

कार्यालय -प्रकल्प संचालक (आत्मा), कदीमबाग नर्सरी ,सि व्हील लाईन

इमेल -nagpur.diu.smart@gmail.com (8806021700)


जाक्र/प्र.स./स्मार्ट/ 519/24 दिनांक २१/१०/२०२४

**कारणे दाखवा नोटिस**

प्रति

संचालक,

एन.बि. शेतकरी उत्पादक कंपनी लि.रामटेक

ता.रामटेक जि.नागपूर

**विषय- कंपनीच्या बँक खात्यातुत स्व:हिस्सा काढण्याबाबत खुलासा सादर करणेबाबत.**

**संदर्भ**-1 प्रथम टप्यातील मंजुर अनुदान क्र.1402 दि.11/09/2024

2. आपल्या कंपनीचे पत्र पहिल्या अनुदानातील दुसरा टप्पा मिळणे बाबत दि.28/09/2024

3. बँक खात्याचे स्टेटमेंट दि. 21/10/2024

4. मार्गदर्शक सुचना

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, स्मार्ट प्रकल्पा अंतर्गत आपल्या कंपनीला मंजुरी प्राप्त झाली असुन आपल्या कंपनी मार्फत गोदाम बांधकाम व मशिनरी खरेदी करण्याचे कामकाज सुरु आहे. त्या अनुषंगाने **संदर्भ क्र**.01 नुसार आपणास **रू.** 25.00 /- **लाख** इतके अनुदान मंजुर झाले होते त्या अनुषंगाने **संदर्भ क्र.** 02. नुसार आपण पहिल्या अनुदानातील दुसरा टप्पाची मागणी केली होती. परंतु **संदर्भ क्र.** 03 नुसार आपल्या कंपनीच्या बँक खात्याची तपासणी केली असता त्यात असे निदर्शनास आले की, दि. 15/07 /2024 रोजी **रू.** 10.00 **लाख** इतका स्व:हिस्सा आपल्या मार्फत भरण्यात आला व त्याच बरोबर दि. 25/072024 रोजी आपण सदर खात्यातुन भरलेला स्व:हिस्सा **रू.** 10.00 **लाख** काढुन घेतल्याचे निदर्शनास आले तसेच दि.12/08/2024 रोजी श्री. मयुर खराबे यांचे खात्यातुन **रू.** 20.00 **लाख** जमा आणि दि. 13/08/2024 रोजी त्याच नावे **रू.**20.00 **लाख** रक्कम वळती केल्याचे आढळुन आलेले आहे.

अनुदान प्राप्त होणाच्या वेळेवर आपण परस्पर जमा केलेला स्व:हिस्सा काढल्याचे निर्दशनास आले आहे. व हि बाब फार गंभीर आहे . **संदर्भ क्र** . 04 नुसार मार्गदर्शक सुचना तसेच कंपनीच्या बँक खात्यातील जमा रक्कमेबाबत परस्पर आर्थिक व्यवहार (पेसे काढणे) करू शकत नसल्याबाबत आपणास वारंवार सुचना देण्यात आल्या होत्या.

**तरी देखील आपण सदर बँक खात्यातुन रू.10.00लाख व रू.20.00 लाख काढल्याचे दिसत आहे. असे करून आपण कंपनी, बँक व प्रकल्प यातील त्रिपक्षीय करार भंग केला असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे आपला मंजुर प्रकल्प रद्द का ? करून नये याबाबत व सदर बँक खात्यातील काढलेल्या रक्कमेचा खुलासा दोन दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.**

डॉ.अर्चना कडू

प्रमुख

जिल्हा प्रकल्प अमलबजावणी कक्ष स्मार्ट नागपूर

प्रतिलिपी – 1. मा.नोडल अधिकारी पीआयायु कृषि पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा.विभागीय अंमलबजावणी कक्ष स्मार्ट नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर

# N. B. FARMERS PRODUCER COMPANY LTD

**Ramtek. Th. Ramtek Dist. Nagpur**

**Address:** C/O Yogesh Nilkanthrao Kurve, Ambala Road, Ramtek, Nagpur

**Mo. No. 9422128655, 9545306351**

**Email Id:** - nbfarmers2021@gmail.com


**जा.क्र.:NBFPC/24/52** **दिनांक :24/10/2024**

प्रती,

मा. प्रमुख जिल्हा अमलबजावणी कक्ष, स्मार्ट,
तथा प्रकल्प संचालक आत्मा, नागपूर

**विषय :- कंपनीच्या बँक खात्यातून झालेल्या व्यवहाराबद्दल स्पष्टीकरण देण्याबाबद.**

संदर्भ :-

1. कारणे दाखवा नोटीस पत्र क्र. ५१९/२४ दि. २१/१०/२०२४
2. एन. बी. शेतकरी उत्पादक कंपनी चे ठराव क्र. NBFPC/२४/०३ दि. २४/०७/२०२४

महोदय,

वरील विषयानुषार विनंती करण्यात येत आहे कि, एन. बी. शेतकरी उत्पादक कंपनी रामटेक यांना संदर्भ क्र. १ नुसार कारणे दाखवा नोटीस मिळालेला आहे त्यामध्ये आपणास निदर्शनास आले कि, दि. १५/०७/२०२४ रोजी रु. 10.00 लाख इतका स्वः हिस्सा आपल्या मार्फत भरण्यात आला व त्याच बरोबर दि. १५/०७/२०२४ रोजी आपण सदर खात्यातून भरलेला स्वःहिस्सा रु. 10.00 लाख काढून घेतल्याचे निदर्शनास आले. त्याचे स्पष्टीकरण खालीली प्रमाणे आहे.

**स्पष्टीकरण :-** एन. बी. शेतकरी उत्पादक कंपनीने स्वः हिस्सा दि. १५/०७/२०२४ ला बँक खात्या मध्ये जमा केला, पण कर्ज वितरीत होण्यासाठी बँक ला जमीन मोरगेज करण्यासाठी बँकने सर्च रिपोर्ट काढले असता जमिनीतील काही हिस्सा श्रीराम सिटी फाईनान्स यया कंपनीला मोरगेज असल्या कारणांने बँक ला त्या फाईनान्स कंपनी कडून NOC पाहिजे होती. त्यामुळे बँक कर्ज वितरीत होण्यास वेळ लागणार असल्या कारणाने कंपनीच्या सर्व संचालक मंडळाने सभा घेऊन तो स्वः हिस्सा काढण्याचा निर्णय घेण्यात आला. व तसा ठराव पण पास करण्यात आलेला आहे.

दि. १२/०८/२०२४ रोजी श्री. मयूर खराबे यांचे खात्यातून रु. 20.00 लाख जमा आणि दि. १३/०८/२०२४ रोजी त्याच नावे रु. 20.00 लाख रक्कम वळती केल्याचे आढळून आलेले आहे.

**स्पष्टीकरण :-** कंपनी अंतर्गत व्यवहार करण्याकरिता बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या सूचना होत्या कि, बँक कर्ज वितरीत होण्या करीता कंपनीचे कोणत्याही दुसऱ्या बँक मध्ये चालू खाते बंद करावे असे सूचना देण्यात आल्या व त्यानुसार संचालकाची सभा दि. १२/०८/२०२४ रोजी घेण्यात आली व

(PTO)

# N. B. FARMERS PRODUCER COMPANY LTD

**Ramtek. Th. Ramtek Dist. Nagpur**

**Address:** C/O Yogesh Nilkanthrao Kurve, Ambala Road, Ramtek, Nagpur

**Mo. No. 9422128655, 9545306351**

**Email Id:** - nbfarmers2021@gmail.com


कंपनीचे बँक ऑफ बरोदा मधील बँक खाते बंद करण्याचे निर्णय घेउन ठराव पास करण्यात आला. व पुढील व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्र मधील खात्या मध्ये घेण्याचे ठरवण्यात आले. त्या नुसार श्री. मयूर

खराबे दि. १२/०८/२०२४ रोजी यांच्या कडून रु. 20.00 लाख रुपयाचा व्यवहार करण्यात आला परंतु त्याच दिवशी बँक मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांन कडून सांगण्यात आले कि, आपण हा खाता स्मार्ट मधील अनुदानाकरिता दिला आहे व या खात्याचा Grant Agreement झाला आहे त्यामुळे या खात्यातून हे पैसे ज्यांच्या कडून आलेले आहे त्यांना परत करावे व बँक ऑफ महाराष्ट्र मधी दुसरा चालू खाता काढावा व त्या मधून कंपनीचे दैनंदिन व्यवहार करावे. त्या नुसार त्वरित दि. १३/०८/२०२४ रोजी आलेले पैसे परत करण्यात आले. आणि दि. १४/०८/२०२४ ला कंपनीच्या संचालकांची सभा बोलवण्यात आली व कंपनीच्या दैनंदिन व्यवहारासाठी बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नवीन चालू खाते काढण्याचे निर्णय घेऊन ठराव पास करण्यात आला. व दि. १५/०८/२०२४ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये चालू खाता उघडण्यात आला व त्या मधून दैनंदिन व्यवहार चालू आहे.

**तरी देखील कंपनीने सदर बँक खात्यात दि. १२/०९/२०२४ रोजी स्मार्ट मधील मंजूर अनुदान रु. 25.00 लाख रुपये आल्या नंतर स्मार्ट अंतर्गत निधी वितरण आदेश दि. १३/०९/२०२४ नुसार पुढील व्यवहार करण्यात आले व स्व: हिस्सा पण पूर्ण जमा करण्यात आलेला आहे व त्या स्व: हिस्स्यातून कोणतीही रक्कम कुठही खर्च करणायत आलेला नाही. तरी आपणास दि. २२/१०/२०२४ रोजी परंत बँक खात्याचे स्टेटमेंट आपणास सादर करण्यात येत आहे. तरी पण पुढील काळात आपल्या निधी वितरण आदेश शिवाय कोणत्याही प्रकारचे व्यवहार करण्यात येणार नाहीत याची पूर्ण दक्षता घेण्यात येईल. हि विनंती.**

सहपत्र :-

1. कंपनीचे ठराव प्रत.
2. बँक स्टेटमेंट

NB FARMERS PRODUCER
COMPANY LIMITED
President / Secretary

अध्यक्ष
एन. बी. शेतकरी उत्पादक कंपनी
लिमिटेड, रामटेक

दिनांक :-24/10/2024
ठिकाण :- रामटेक

N.B. FARMER PRODUCER CO. LTD RAMTEK

# कृषि विभाग
## जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट)
कार्यालय-प्रकल्प संचालक (आत्मा),कदिमबाग नर्सरी, सिव्हिल लाईन, नागपूर-४४०००१
ईमेल-nagpur.diu.smart@gmail.com (8806021700)


जाक्र/प्र.स./स्मार्ट/५५१/२४

दिनांक १४/११/२०२४

प्रति ,

**मा. प्रमुख ,**
**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष कृषी**
**स्मार्ट प्रकल्प, पुणे**

**विषय- एन.बी. शेतकरी उत्पादक कंपनी लि.रामटेक जि.नागपूर या सिबीओने स्व:हिस्सा काढले बाबत खुलासा .**

**संदर्भ-** 1. या कार्यालयाचे पत्र क्र.72 /24 दि12/02/2024
2. या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटिस पत्र क्र. 519/24 दि.21/10/2024
3 एन.बी.शेतकरी उत्पादक कंपनी लि.रामटेक यांचे पत्र क्र.NBFPC/24/52 Date 24/10/2024
4. या कार्यालयाचे पत्र क्र.स्मार्ट/526/2024 दि. 5/11/2024
5. जाक्र/पीआययु/स्मार्ट/1730/2024 दि.06/11/2024

**मार्फत** — मा. विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर विभाग - नागपूर .

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पा अंतर्गत एन.बी. शेतकरी उत्पादक कंपनी ली. रामटेक जि.नागपूर या सीबीओ ने स्व:हिस्सा काढला असता या बाबत कारणे दाखवा नोटिस देण्यात आला असुन त्याचे स्पष्टिकरण खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

प्रथम हप्ता अनुदान मागणी सादर करतेवेळी, प्रथम हप्ता अनुदान मागणी साठी आवश्यक स्व:हिस्सा रक्कम रू.13.06 लाख स्मार्ट प्रकल्पासाठी काढलेल्या स्वतंत्र चालु बँक खात्यात जमा करून तसे बँक स्टेटमेंट या कार्यालयास सादर केले होते. त्या नुसार या कार्यालया मार्फत प्रथम हप्ता अनुदान मागणी करण्यात आली असुन ते अनुदान आपल्या मार्फत सीबीओ चूया खात्यात वितरीत करण्यात आले होते.

जमा केलेल्या स्व:हिस्स्या पैकी रक्कम रू. 10.00 लाख दि..25/07/2024 रोजी कंपनीने काढुन घेतली होती तसेच तदनंतर कंपनीने दि.12/08/2024 रोजी रक्कम रू.20.00 लाख जमा केली व दि.13/08/2024 रोजी कंपनीने पुनश्च काढुन घेतली, त्या नंतर दि.17/08/2024 ते दि.12/09/2024 पर्यंत सीबीओ या कालावधीत रक्कम रू.3.00 लाख वेगवेगळया कारणांसाठी काढुन घेतल्याचे बॅक स्टेटमेंट मध्ये दिसुन आल्याने संबंधित सीबीओ ला संदर्भ क्र. 02 नुसार बँक खात्यातील काढलेल्या रक्कमे बाबतचा खुलासा

मागविला असता संदर्भ क्र. 03 नुसार संबंधित सीबीओ यांनी खुलासा सादर केलेला असुन सदर खुलासा सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.

नोडल अधिकारी जिल्हा अंमलबजावणी कक्ष या नात्याने सीबीओ ला स्मार्ट प्रकल्पासाठी काढलेल्या चालु बँक खात्यामधनु कोणत्याही प्रकल्प बाहय कारणांसाठी खर्च करता येणार नाही तसेच E-pay slip व्यतिरिक्त सीबीओ च्या स्मार्ट प्रकल्पा साठी काढलेल्या चालु बँक खात्यामधुन कोणत्याही प्रकारे व्यवहार होणार नाही याबाबतची पुर्व कल्पाना वारंवार विविध सभेव्दारे तसचे संदर्भिय पत्र क्र.01 नुसार सीबीओ व संबंधित बँकेला सुध्दा देण्यात आली होती. तसेच बँकांना E-pay slip वापराबाबत व आर्थिक व्यवहाराबाबत व्यक्तिशः भेटून सुद्धा सांगण्यात आले होते.

प्रथम हप्त्यातील उर्वरीत अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करतांना सीबीओ ने बँक खात्यातील स्व:हिस्सा जमा केल्याचे त्या कालावधीतीलच स्टेंटमेंट या कार्यालयास सादर केले होते.त्या नुसार या कार्यालया मार्फत उर्वरीत अनुदानाची मागणी करण्यात आली होती.

सिबिओ संचालकांना वारंवार सूचना देवूनही त्यांनी दोन संचालकाच्या सह्या वापरून या कार्यालयाची परवानगी न घेता परस्पर आर्थिक व्यवहार केले. स्मार्ट प्रकल्पा साठी काढलेल्या चालु बँक खात्यामधुन कोणत्याही प्रकारे व्यवहार होणार नाही याबाबत संदर्भीय पत्र क्र. 4 अन्वये सिबिओ व बँकेला पुन्हा ताकीद देण्यात आली . पुनश्च असे चुकीचे आर्थिक व्यवहार झाल्यास आपला प्रकल्प रद्द करण्यात येईल अशी ताकीद संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये सिबिओ संचालकांना देण्यात आली आहे.

करीता सादर करण्यात येते की,नोडल अधिकारी या नात्याने सदर मुद्यांबाबत या स्तरावरून सनियंत्रण करण्याचा पुर्ण प्रयत्न करण्यात आला असुन सदरचा खुलासा ग्राहय धरण्यात यावा हि विनंती .

सहपत्र- वरील संदर्भीय पत्र

**नोडल अधिकारी**
**जिल्हा अंमलबजावणी कक्ष(स्मार्ट)**
**नागपूर**

प्रतिलिपी – [illegible]
प्र.मा. मुख्य संचालक, पी.सी.एम.यु., पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

प्रधान कार्यालय : 'लोकमंगल',1501, शिवाजीनगर, पुणे - 411005.
H. O.: 'Lokmangal', 1501, Shivajinagar, Pune - 411005.

| Account Details | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Account No** | 60442343787 | **Account Open Date** | 23/03/2023 | **Nomination Flag** | N |
| **Account Type** | Cur-Gen-Pub-Corp-NonRural | | **Nominee Name** | NA | |
| **Mode of Operation** | JOINTLY BY ALL | **Total Balance** | 40,03,361.81 | **Available Balance** | 40,03,361.81 |
| **QAB Required** | 5000.000 | | **QAB Maintained** | 4654382.635 | |
| **Account Holder Names** | NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | | **Primary GSTIN** | NA |

| Customer Details | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name** | NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | | **CIF Number** | 40260929173 |
| **Mobile** | xxxxxxxxxx68 | **Email** | nxxxxxxxxxxxxx@gmail.com | | |
| **KYC Complied** | Y | **KYC Expiry Date** | 30/09/2032 | **CKYC ID** | Not Available |
| **Primary ID Type** | CERT.OF INCORPORATION COMPANY | **Date of Birth** | 18xxxxxx20 | **Statement Date** | Wed Oct 15 12:47:37 GMT+05:30 2025 |
| **Address** | C/O. YOGESH LILKANTHRAO KURVE, AMBALA ROAD, TAL RAMEK, DIST NAGPUR, MAHARASHTRA, 441106 | | | | |

| Home Branch Details | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Branch No** | 01911 | **Branch Name** | RAMTEK | **IFSC** | MAHB0001911 |
| **Phone No** | 4256636 | **Email Id** | bom1911@mahabank.co.in | **GSTIN** | 27AACCB0774B1Z4 |
| **Address** | Shri Kiran Karemore Bhagatsingh Ward, Survey No 1820/1821 Gandhi Chowk, RAMTEK, MAHARASHTRA, 441106 | | | | |

**A. Statement for Account No 60442343787 from 01/01/2024 to 31/12/2024**

| Sr No | Date | Particulars | Cheque/Reference No | Debit | Credit | Balance | Channel |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 08/01/2024 | LF CHG CA AC | | 100.00 | - | 3,24,153.64 | 9999-CENTRAL OFF |
| 2 | 08/01/2024 | GST | | 18.00 | - | 3,24,135.64 | 9999-CENTRAL OFF |
| 3 | 08/04/2024 | LF CHG CA AC | | 100.00 | - | 3,24,035.64 | 9999-CENTRAL OFF |
| 4 | 08/04/2024 | GST | | 18.00 | - | 3,24,017.64 | 9999-CENTRAL OFF |
| 5 | 08/07/2024 | LF CHG CA AC | | 100.00 | - | 3,23,917.64 | 9999-CENTRAL OFF |
| 6 | 08/07/2024 | GST | | 18.00 | - | 3,23,899.64 | 9999-CENTRAL OFF |
| 7 | 15/07/2024 | RTGS HDFCR52024071575051498 ASHOK MITTHUJI LOKHAND HDFC0009155 | HDFCR52024071575051498 | - | 10,00,000.00 | 13,23,899.64 | 9008-NEFT/ RTGS CELL |
| 8 | 15/07/2024 | NEFT MAHBH24197392701 SAMEER ADVERITISNG AGENCY HDFC0004034 | 35307 | 17,000.00 | - | 13,06,899.64 | 1911-RAMTEK |
| 9 | 15/07/2024 | NA | | 5.00 | - | 13,06,894.64 | 1911-RAMTEK |
| 10 | 15/07/2024 | GST | | 0.90 | - | 13,06,893.74 | 1911-RAMTEK |
| 11 | 25/07/2024 | RTGS MAHBR52024072517872134 ASHOK MITTHUJI LOKHAN HDFC0009155 | 35308 | 10,00,000.00 | - | 3,06,893.74 | 1911-RAMTEK |
| 12 | 25/07/2024 | NA | | 50.00 | - | 3,06,843.74 | 1911-RAMTEK |
| 13 | 25/07/2024 | GST | | 9.00 | - | 3,06,834.74 | 1911-RAMTEK |
| 14 | 30/07/2024 | MONTHLY SMS CHA | | 1.00 | - | 3,06,833.74 | 9999-CENTRAL OFF |
| 15 | 30/07/2024 | GST | | 0.18 | - | 3,06,833.56 | 9999-CENTRAL OFF |
| 16 | 12/08/2024 | RTGS IOBAR52024081200273996 MAYUR PANDURANG KHARAB IOBA0003544 | IOBAR52024081200273996 | - | 20,00,000.00 | 23,06,833.56 | 9008-NEFT/ RTGS CELL |
| 17 | 13/08/2024 | RTGS MAHBR52024081318009431 MAYUR PANDURANG KHARA IOBA0003544 | 35309 | 20,00,000.00 | - | 3,06,833.56 | 1911-RAMTEK |
| 18 | 13/08/2024 | NA | | 50.00 | - | 3,06,783.56 | 1911-RAMTEK |
| 19 | 13/08/2024 | GST | | 9.00 | - | 3,06,774.56 | 1911-RAMTEK |
| 20 | 17/08/2024 | kishor jamunpane | 35311 | 30,000.00 | - | 2,76,774.56 | 1911-RAMTEK |
| 21 | 19/08/2024 | kishor jamunpane | 35312 | 70,000.00 | - | 2,06,774.56 | 1911-RAMTEK |
| 22 | 19/08/2024 | TO RTGS PARKING ACCOUNT STAMP DUTY ESTBTR BANK OF MAHARASHTRA | 35310 | 23,400.00 | - | 1,83,374.56 | 1911-RAMTEK |
| 23 | 19/08/2024 | ACCOUNT HANDLING AND PROCESSING FEE TRANSFER TO 60502807052 TO NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | 1,41,710.92 | - | 41,663.64 | 1911-RAMTEK |
| 24 | 30/08/2024 | MONTHLY SMS CHA | | 1.50 | - | 41,662.14 | 9999-CENTRAL OFF |
| 25 | 30/08/2024 | GST | | 0.27 | - | 41,661.87 | 9999-CENTRAL OFF |
| 26 | 12/09/2024 | dhanraj shankar jawanjar | 35314 | 37,000.00 | - | 4,661.87 | 1911-RAMTEK |
| 27 | 12/09/2024 | ACH 10483917-C09241 C092418988510 | | 1st - A | 25,00,000.00 | 25,04,661.87 | 1001-MUMBAI SERVICE BRANCH |
| 28 | 19/09/2024 | Deposit by s | | - | 4,10,000.00 F | 29,14,661.87 | 1911-RAMTEK |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 29 | 19/09/2024 | CASH HANDLING C | | 310.00 | - | 29,14,351.87 | 1911-RAMTEK |
| 30 | 19/09/2024 | GST | | 55.80 | - | 29,14,296.07 | 1911-RAMTEK |
| 31 | 25/09/2024 | TRANSFER FROM 60502807052 FRM NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | - | 12,17,514.62 | 41,31,810.69 | 1911-RAMTEK |
| 32 | 25/09/2024 | RTGS MAHBR52024092518332131 PRIYANKA LOKHANDE HDFC0009155 | 35315 | 34,43,589.54 | - | 6,88,221.15 | 1911-RAMTEK |
| 33 | 25/09/2024 | NA | | 50.00 | - | 6,88,171.15 | 1911-RAMTEK |
| 34 | 25/09/2024 | GST | | 9.00 | - | 6,88,162.15 | 1911-RAMTEK |
| 35 | 29/09/2024 | MONTHLY SMS CHA | | 1.25 | - | 6,88,160.90 | 9999-CENTRAL OFF |
| 36 | 29/09/2024 | GST | | 0.22 | - | 6,88,160.68 | 9999-CENTRAL OFF |
| 37 | 30/09/2024 | TO NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED BANK OF MAHARASHTRA | 35316 | 6,14,792.52 | - | 73,368.16 | 1911-RAMTEK |
| 38 | 05/10/2024 | RTGS HDFCR52024100599380646 RAMSINGH SHANKARRAO SA HDFC0009155 | HDFCR52024100599380646 | - | 7,00,000.00 | 7,73,368.16 | 9008-NEFT/ RTGS CELL |
| 39 | 11/10/2024 | cdr trf TRANSFER TO 60509040018 TO NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | 3,00,000.00 | - | 4,73,368.16 | 1911-RAMTEK |
| 40 | 11/10/2024 | cdr trf TRANSFER TO 60509040290 TO NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | 4,00,000.00 | - | 73,368.16 | 1911-RAMTEK |
| 41 | 15/10/2024 | NEFT MAHBH24289308240 VINOD DYANDEO INGOLE SBIN0006996 | 35319 | 8,000.00 | - | 65,368.16 | 1911-RAMTEK |
| 42 | 15/10/2024 | NA | | 2.00 | - | 65,366.16 | 1911-RAMTEK |
| 43 | 15/10/2024 | GST | | 0.36 | - | 65,365.80 | 1911-RAMTEK |
| 44 | 22/10/2024 | NEFT IOBAN24296309764 MAYUR PANDU MAHB242965051291 IOBA0003544 | IOBAN24296309764 | - | 1,00,000.00 | 1,65,365.80 | 9008-NEFT/ RTGS CELL |
| 45 | 22/10/2024 | Deposit by s TRANSFER FROM 60442343787 | | - | 40,000.00 | 2,05,365.80 | 1911-RAMTEK |
| 46 | 22/10/2024 | CLOSE TRANSFER FROM 60509040018 FRM NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | - | 3,00,158.00 | 5,05,523.80 | 1911-RAMTEK |
| 47 | 22/10/2024 | CLOSE TRANSFER FROM 60509040290 FRM NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | - | 4,00,211.00 | 9,05,734.80 | 1911-RAMTEK |
| 48 | 23/10/2024 | ACH 10922509-C10244 C102444914968 | | - | 25,00,000.00 | 34,05,734.80 | 1001-MUMBAI SERVICE BRANCH |
| 49 | 30/10/2024 | MONTHLY SMS CHA | | 2.50 | - | 34,05,732.30 | 9999-CENTRAL OFF |
| 50 | 30/10/2024 | GST | | 0.45 | - | 34,05,731.85 | 9999-CENTRAL OFF |
| 51 | 31/12/2024 | TRANSFER FROM 60502807052 FRM NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | - | 9,46,200.90 | 43,51,932.75 | 1911-RAMTEK |
| 52 | 31/12/2024 | RTGS MAHBR52024123119213102 PRIYANKA LOKHANDE HDFC0009155 | 35320 | 29,40,172.00 | - | 14,11,760.75 | 1911-RAMTEK |
| 53 | 31/12/2024 | NA | | 50.00 | - | 14,11,710.75 | 1911-RAMTEK |
| 54 | 31/12/2024 | GST | | 9.00 | - | 14,11,701.75 | 1911-RAMTEK |

### B. Summary for Account No 60442343787 from 01/01/2024 to 31/12/2024

| | | | |
|---|---|---|---|
| **Total Transaction Count** | 54 | **Opening Balance** | 3,24,253.64 |
| **Total Debit Count** | 42 | **Total Debit Amount** | 1,10,26,636.41 |
| **Total Credit Count** | 12 | **Total Credit Amount** | 1,21,14,084.52 |
| | | **Closing Balance** | 14,11,701.75 |

*** END OF STATEMENT**

- All the amounts in the Statement are in INR
- This is a System Generated Statement. No Signature is Required.
- The Customer is advised to keep their KYC updated periodically with Officially Valid Documents (OVDs) as part of regulatory requirements. Please update your Aadhaar, if it is more than 10 year old.
- **Please update your PAN number in your Account, if not done so far.**


बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

प्रधान कार्यालय : 'लोकमंगल',1501, शिवाजीनगर, पुणे - 411005.
H. O.: 'Lokmangal', 1501, Shivajinagar, Pune - 411005.

| All India Toll Free Number : | 1800-233-4526 / 1800-102-2636 | Website : www.bankofmaharashtra.in |
|---|---|---|

https://twitter.com/mahabank
https://www.facebook.com/mahabank
https://wa.me/+917066036640
https://www.youtube.com/channel/UCevaMPXN3n3aHZqbBl4sd
https://www.linkedin.com/company/mahabank
https://www.instagram.com/mahabank/
https://in.pinterest.com/mahabank/

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

प्रधान कार्यालय : 'लोकमंगल',1501, शिवाजीनगर, पुणे - 411005.
H. O.: 'Lokmangal', 1501, Shivajinagar, Pune - 411005.

| Account Details | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Account No** | 60442343787 | **Account Open Date** | 23/03/2023 | **Nomination Flag** | N |
| **Account Type** | Cur-Gen-Pub-Corp-NonRural | | **Nominee Name** | NA | |
| **Mode of Operation** | JOINTLY BY ALL | **Total Balance** | 40,03,361.81 | **Available Balance** | 40,03,361.81 |
| **QAB Required** | 5000.000 | | **QAB Maintained** | 4654382.635 | |
| **Account Holder Names** | NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | | **Primary GSTIN** | NA |

| Customer Details | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name** | NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | | **CIF Number** | 40260929173 |
| **Mobile** | xxxxxxxxxx68 | **Email** | nxxxxxxxxxxxxx@gmail.com | | |
| **KYC Complied** | Y | **KYC Expiry Date** | 30/09/2032 | **CKYC ID** | Not Available |
| **Primary ID Type** | CERT.OF INCORPORATION COMPANY | **Date of Birth** | 18xxxxxx20 | **Statement Date** | Wed Oct 15 12:47:44 GMT+05:30 2025 |
| **Address** | C/O. YOGESH LILKANTHRAO KURVE, AMBALA ROAD, TAL RAMEK, DIST NAGPUR, MAHARASHTRA, 441106 | | | | |

| Home Branch Details | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Branch No** | 01911 | **Branch Name** | RAMTEK | **IFSC** | MAHB0001911 |
| **Phone No** | 4256636 | **Email Id** | bom1911@mahabank.co.in | **GSTIN** | 27AACCB0774B1Z4 |
| **Address** | Shri Kiran Karemore Bhagatsingh Ward, Survey No 1820/1821 Gandhi Chowk, RAMTEK, MAHARASHTRA, 441106 | | | | |

### A. Statement for Account No 60442343787 from 01/01/2025 to 14/10/2025

| Sr No | Date | Particulars | Cheque/Reference No | Debit | Credit | Balance | Channel |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 14/01/2025 | TO NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED BANK OF MAHARASHTRA | 35321 | 2,13,831.00 | - | 11,97,870.75 | 1911-RAMTEK |
| 2 | 29/01/2025 | ACH 12048842-C01255 C012550908506 | | - | 27,44,000.00 | 39,41,870.75 | 1001-MUMBAI SERVICE BRANCH |
| 3 | 30/01/2025 | MONTHLY SMS CHA | | 1.20 | - | 39,41,869.55 | 9999-CENTRAL OFF |
| 4 | 30/01/2025 | GST | | 0.21 | - | 39,41,869.34 | 9999-CENTRAL OFF |
| 5 | 07/02/2025 | CHQ DT 06/02/2025 BCB-000020000 | 994591 | - | 2,00,000.00 | 41,41,869.34 | 1001-MUMBAI SERVICE BRANCH |
| 6 | 27/02/2025 | MONTHLY SMS CHA | | 0.30 | - | 41,41,869.04 | 9999-CENTRAL OFF |
| 7 | 27/02/2025 | GST | | 0.05 | - | 41,41,868.99 | 9999-CENTRAL OFF |
| 8 | 12/03/2025 | FRM NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED BANK OF MAHARASHTRA | 41177 | - | 3,66,731.40 | 45,08,600.39 | 1911-RAMTEK |
| 9 | 30/03/2025 | MONTHLY SMS CHA | | 0.30 | - | 45,08,600.09 | 9999-CENTRAL OFF |
| 10 | 30/03/2025 | GST | | 0.05 | - | 45,08,600.04 | 9999-CENTRAL OFF |
| 11 | 28/05/2025 | TRANSFER FROM 60502807052 FRM NB FARMERS PRODUCER COMPANY LIMITED | | - | 5,92,522.50 | 51,01,122.54 | 1911-RAMTEK |
| 12 | 28/05/2025 | RTGS MAHBR52025052820677550 PRIYANKA LOKHANDE HDFC0009155 | 35322 | 19,75,075.00 | - | 31,26,047.54 | 1911-RAMTEK |
| 13 | 28/05/2025 | NA | | 50.00 | - | 31,25,997.54 | 1911-RAMTEK |
| 14 | 28/05/2025 | GST | | 9.00 | - | 31,25,988.54 | 1911-RAMTEK |
| 15 | 28/05/2025 | RTGS HDFCR52025052875377502 RAMSINGH SHANKARRAO SA HDFC0009155 | HDFCR52025052875377502 | - | 6,00,000.00 | 37,25,988.54 | 9008-NEFT/ RTGS CELL |
| 16 | 28/05/2025 | RTGS HDFCR52025052875365170 ASHOK MITTHUJI LOKHAND HDFC0009155 | HDFCR52025052875365170 | - | 6,50,000.00 | 43,75,988.54 | 9008-NEFT/ RTGS CELL |
| 17 | 30/05/2025 | TO Central Govt Taxes DON COLL: TINTAX REF:25053000034546 DON COLL:RASHTRA REF: | 35324 | 26,044.00 | - | 43,49,944.54 | 1911-RAMTEK |
| 18 | 30/05/2025 | NEFT MAHBN62025053014389318 MAHARASHTRA BUILDING | 35323 | 26,044.00 | - | 43,23,900.54 | 1911-RAMTEK |
| 19 | 30/05/2025 | MONTHLY SMS CHA | | 1.80 | - | 43,23,898.74 | 9999-CENTRAL OFF |
| 20 | 30/05/2025 | GST | | 0.32 | - | 43,23,898.42 | 9999-CENTRAL OFF |
| 21 | 24/06/2025 | CHQ RET CHARGES | | 150.00 | - | 43,23,748.42 | 1001-MUMBAI SERVICE BRANCH |
| 22 | 24/06/2025 | GST | | 27.00 | - | 43,23,721.42 | 1001-MUMBAI SERVICE BRANCH |
| 23 | 26/06/2025 | TAHASILDAR RAMTEK SALAR | 35325 | 28,017.92 | - | 42,95,703.50 | 1001-MUMBAI SERVICE BRANCH |
| 24 | 29/06/2025 | MONTHLY SMS CHA | | 0.60 | - | 42,95,702.90 | 9999-CENTRAL OFF |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 25 | 29/06/2025 | GST | | 0.10 | - | 42,95,702.80 | 9999-CENTRAL OFF |
| 26 | 21/08/2025 | TRANSFER FROM 60502807052<br>FRM NB FARMERS PRODUCER<br>COMPANY LIMITED | | - | 3,29,446.41 | 46,25,149.21 | 1911-RAMTEK |
| 27 | 30/08/2025 | MONTHLY SMS CHA | | 0.30 | - | 46,25,148.91 | 9999-CENTRAL OFF |
| 28 | 30/08/2025 | GST | | 0.05 | - | 46,25,148.86 | 9999-CENTRAL OFF |
| 29 | 02/09/2025 | Deposit by s | | - | 8,000.00 | 46,33,148.86 | 1911-RAMTEK |
| 30 | 02/09/2025 | Deposit by ABHISHEK KOHALE | | - | 71,313.00 | 47,04,461.86 | 1911-RAMTEK |
| 31 | 29/09/2025 | MONTHLY SMS CHA | | 0.60 | - | 47,04,461.26 | 9999-CENTRAL OFF |
| 32 | 29/09/2025 | GST | | 0.10 | - | 47,04,461.16 | 9999-CENTRAL OFF |
| 33 | 14/10/2025 | TO Central Govt Taxes DON COLL:<br>TINTAX REF:25101100063653<br>DON COLL:RASHTRA REF: | 35329 | 1,238.00 | - | 47,03,223.16 | 1911-RAMTEK |
| 34 | 14/10/2025 | NEFT MAHBN62025101427641272<br>MAHARASHTRA BUILDING | 35328 | 1,238.00 | - | 47,01,985.16 | 1911-RAMTEK |
| 35 | 14/10/2025 | TRANSFER FROM 60502807052<br>FRM NB FARMERS PRODUCER<br>COMPANY LIMITED | | - | 2,99,384.65 | 50,01,369.81 | 1911-RAMTEK |
| 36 | 14/10/2025 | RTGS MAHBR52025101421854049<br>PRIYANKA ASHOK LOKHAN<br>HDFC0009155 | 35327 | 9,97,949.00 | - | 40,03,420.81 | 1911-RAMTEK |
| 37 | 14/10/2025 | NA | | 50.00 | - | 40,03,370.81 | 1911-RAMTEK |
| 38 | 14/10/2025 | GST | | 9.00 | - | 40,03,361.81 | 1911-RAMTEK |

### B. Summary for Account No 60442343787 from 01/01/2025 to 14/10/2025

| | | | |
|---|---|---|---|
| **Total Transaction Count** | 38 | **Opening Balance** | 14,11,701.75 |
| **Total Debit Count** | 28 | **Total Debit Amount** | 32,69,737.90 |
| **Total Credit Count** | 10 | **Total Credit Amount** | 58,61,397.96 |
| | | **Closing Balance** | 40,03,361.81 |

*** END OF STATEMENT**

- All the amounts in the Statement are in INR
- This is a System Generated Statement. No Signature is Required.
- The Customer is advised to keep their KYC updated periodically with Officially Valid Documents (OVDs) as part of regulatory requirements. Please update your Aadhaar, if it is more than 10 year old.
- **Please update your PAN number in your Account, if not done so far.**

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

प्रधान कार्यालय : 'लोकमंगल',1501, शिवाजीनगर, पुणे - 411005.
H. O.: 'Lokmangal', 1501, Shivajinagar, Pune - 411005.

| | | |
|---|---|---|
| All India Toll Free Number : | 1800-233-4526 / 1800-102-2636 | Website : www.bankofmaharashtra.in |

https://twitter.com/mahabank
https://www.facebook.com/mahabank
https://wa.me/+917066036640
https://www.youtube.com/channel/UCevaMPXN3n3aHZqbBl4sd
https://www.linkedin.com/company/mahabank
https://www.instagram.com/mahabank/
https://in.pinterest.com/mahabank/